# थेट निवडून आलेल्या सरपंचांचे प्रशिक्षण

सरपंच हा ग्रामपंचायतीचा कार्यकारी प्रमुख आहे. ग्रामपंचायतीचे कार्यकारी मंडळ, गावपातळीवर काम करणारे विविध शासकीय कर्मचारी, ग्रामस्थ आणि गावपातळीवरील इतर संस्था यांना बरोबर घेऊन, सर्वांमध्ये योग्य तो समन्वय साधून सरपंचांना कायद्याने दिलेली आपली जबाबदारी पार पाडावी लागते.

“गावाच्या विकासासाठी प्रभावशाली नेतृत्व “ अशा भूमिकेतून आणि विकासाची एक दृष्टि घेऊन त्यांना काम करणे अपेक्षित आहे.

गावातील विविध घटकांचा सहभाग गावाच्या विकासाच्या निर्णयप्रक्रियेत आणि त्या निर्णयांच्या अंमलबजावणीत अत्यावश्यक आहे.जनतेने थेट निवडून दिलेल्या थेट निवड झालेल्या सरपंचांचे उत्तरदायित्व काकणभर अधिकच आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

गावातील जनतेला ग्रामपंचायतीमार्फत देण्यात येणाऱ्या सेवा सुविधा योग्य प्रकारे मिळाव्यात आणि शासनाच्या विकासाच्या योजनांना ग्रामस्थांना योग्य लाभ मिळून त्यांचे जीवनमानात सुधारणा व्हावी हेच सरपंचांचे आद्य कर्तव्य आहे.

त्यादृष्टिने आवश्यक असणारे प्रशासकीय कौशल्य त्यांना प्राप्त व्हावे, सक्षमपणे कारभार चालवण्यासाठी आवश्यक कायदेविषयक आणि योजनांच्या अंमलबजावणीचे ज्ञान त्यांना मिळावे व गावाच्या विकासासाठी सतत सकारात्मक दृष्टिकोन बाळगून आणि उच्च नैतिक मूल्यांचा अंगिकार करून नेतृत्व करण्याची दृष्टि त्यांच्यात विकसित व्हावी या उद्देशाने थेट निवडून आलेल्या सरपंचांसाठी ३ दिवशीय निवासी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येते.

**प्रशिक्षण विषयक उद्दिष्टे**

१. कायदेविषयक ज्ञान :
   ग्रामपंचायतींच्या दैनंदिन कामकाजाशी निगडित कायदे व नियम यांची माहिती देणे .
२. विविध शासकीय योजना अंमलबजावणी विषयक कौशल्य विकसित करणे.
३. दृष्टीकोन :
   स्वयं स्फूर्तीने / स्वयंप्रेरणेने गावाच्या विकासाला दिशा देण्यासाठी आवश्यक दृष्टिकोन विकसित करणे.